# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 05 June 2025
# Time 18.10 to 18.20
# Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – ०५ जून २०२५ सायंकाळी ६.१०

****

- जागतिक पर्यावरण दिनानिमित्त देशभर वृक्षारोपणासह विविध कार्यक्रम; राज्यात प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन मोहिमेचं आयोजन
- समृद्धी महामार्गाच्या इगतपुरी ते आमणे या ७५ किलोमीटरच्या अखेरच्या टप्प्याचं उद्घाटन
- राज्यात आदिशक्ती अभियान राबवण्यासाठी येत्या १५ दिवसांत ग्रामसमित्या स्थापन करण्याचे निर्देश

आणि

- राज्यात येत्या तीन दिवसात पुन्हा वादळी वाऱ्यासह पावसाचा हवामान विभागाचा इशारा

****

देशभरात आज जागतिक पर्यावरण दिवस साजरा केला जात आहे. पर्यावरण रक्षणाबाबत जागरूकता आणि प्रत्यक्ष कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी, १४३ हून अधिक राष्ट्रांमध्ये पर्यावरण संवर्धनाच्या विविध कार्यक्रमांच्या आयोजनाद्वारे हा दिवस साजरा केला जातो. 'प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदूषणावर मात' ही यंदाच्या पर्यावरण दिनाची मुख्य संकल्पना आहे.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली दिल्लीत विशेष वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली. यावेळी त्यांनी वटवृक्षाचं रोप लावलं.

केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज पर्यावरण दिनानिमित्त नवी दिल्लीत एक पेड माँ के नाम मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रारंभ केला.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा या शासकीय निवासस्थानी वृक्षारोपण केलं. पर्यावरण दिनाच्या या वर्षीच्या संकल्पनेनुसर पर्यावरणाला प्लास्टिक मुक्त करणं ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. राज्य शासनानं आजपासून ३१ ऑक्टोबर पर्यंत राष्ट्रीय प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन मोहिमेचं आयोजन केलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राज्यातही विविध कार्यक्रम होत आहेत. या निमित्तानं मुंबईत आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वातावरण बदलाबाबत जनजागृती करण्यासाठी जागतिक प्रचार मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. राज्य सरकारच्या १० कोटी वृक्षलागवड मोहिमेत नागरिकांनी सहभागी होण्याचं आवाहन त्यांनी केलं.

****

पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत मुंबईत गिरगाव चौपाटी इथं एकल प्लास्टिक निर्मूलन मोहीम राबवण्यात आली. वसुंधरेच्या संरक्षणासाठी पर्यावरण विभागाने पाऊलं उचलली असून नागरिकांनी एकल वापराच्या प्लास्टिकचा वापर टाळण्याचं आवाहन पंकजा मुंडे यांनी यावेळी केलं.

****

छत्रपती संभाजीनगरमध्ये पर्यावरण जागरूकतेसाठी आयोजित केलेल्या सायकल रॅलीचं उद्घाटन खासदार भागवत कराड यांनी केलं. जिल्ह्यातल्या प्रत्येक ग्रामपंचायतीत आणि शहर हद्दीतही आज वृक्ष लागवडीस सुरुवात करण्यात आली. वृक्ष लावा, वृक्ष जगवा म्हणजेच माणूस जगेल, अशा शब्दात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी वृक्ष लागवडीसाठी आवाहन केलं.

****

राज्याच्या वन विभागाद्वारे आज चंद्रपूर इथं 'वनशक्ती २०२५' या वनक्षेत्रातल्या महिलांच्या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन वन मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते झालं. वन क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक पद असलेले मानद वनजीव

रक्षक आता प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे नियुक्त केले जातील, आणि त्यामध्ये महिलांचा सहभाग ५१ टक्के असेल असं नाईक यांनी यावेळी सांगितलं.

****

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या इगतपुरी ते आमणे या ७५ किलोमीटरच्या अखेरच्या टप्प्याचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज इगतपुरी इथं झालं. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते. समृद्धी महामार्गाच्या या टप्प्यामुळे नागपूर ते मुंबई हा प्रवास फक्त आठ तासांत करता येणार आहे. नाशिक आणि ठाणे जिल्ह्यांमधून जाणारा हा शेवटच्या टप्पा सह्याद्रीच्या पर्वतरागांमधून बोगदे आणि पुलांद्वारे पूर्ण केला आहे. यात जवळपास ११ किलोमीटर लांबीचे ५ बोगदे असून, इगतपुरीतला १७ मीटरपेक्षा जास्त रुंद आणि ९ मीटरपेक्षा जास्त उंचीचा बोगदा राज्यातला सर्वात लांब आणि रुंद बोगदा आहे. या बोगद्यात बसवलेल्या जनरेशन व्हेइकल एक्सिट सिस्टम चा वापर भारतात पहिल्यांदाच करण्यात आला आहे.

हा केवळ एक रस्ता नसून, महाराष्ट्राच्या समृद्धीचा इकॉनॉमिक कॉरिडॉर असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात नक्षलमुक्त अभियानात सुरक्षा दलास मोठं यश मिळालं असून, आज झालेल्या चकमकीत नक्षल कमांडर सुधाकर ठार झाला. नॅशनल पार्क जंगल परिसरात ही चकमक सुरु आहे. सुधाकर याच्यावर एक कोटी रुपयांचं बक्षीस होतं, तो अनेक नक्षली हल्ल्यांचा मुख्य सूत्रधार होता.

****

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आदिशक्ती अभियान राबवता यावं याकरता येत्या १५ दिवसांत ग्रामसमित्या स्थापन करण्याचे निर्देश महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिले. या अभियानाअंतर्गत विविध विभागांमधल्या महिलांच्या समस्या सोडवणं, हुंडा प्रथा थांबवणं, महिलांशी निगडित विविध योजनांबद्दल जनजागृती करणं असा व्यापक उपक्रम राबवला जाणार आहे.

****

आगामी आषाढी एकादशीची तयारी राज्यभरात सुरु झाली आहे. वारकऱ्यांना आता पंढरीच्या वारीला जाण्याचे वेध लागले आहेत. संत तुकाराम महाराज पालखी सोहळा १८ जूनला सुरू होईल आणि त्याच दिवशी पालखी देहूतून प्रस्थान करेल. तर, संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचं प्रस्थान १९ जून रोजी होईल. दरवर्षी देशभरातून लाखो वारकरी पंढरपुरात येतात. या वारकऱ्यांनी आपल्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याचं आवाहन सोलापूर जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

****

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातले विद्यार्थी, डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या आरोग्याची देखभाल करणं आवश्यक असल्याचं छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे. छत्रपती संभाजीनगर मधल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या अत्याधुनिक व्यायामशाळेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. या व्यायामशाळेत २२ व्यायामांची साधनं, वॉकिंग ट्रॅक, इनडोअर गेम साठी जागेची व्यवस्था असून, योगासनं आदींसाठीही सुविधा उपलब्ध करण्यात आली असल्याची माहिती अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी यावेळी दिली.

****

येत्या २१ जून रोजी ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येणार आहे. योग दिनाला १५ दिवस बाकी आहेत. आज जाणून घेऊया, छत्रपती संभाजीनगर इथले योगाचार्य महेश पूर्णपात्रे यांनी, मयुरासनाविषयी दिलेली माहिती –

**बाईट – योगाचार्य महेश पूर्णपात्रे**

****

इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीत सात्विक साईराजरँकी रेड्डी आणि चिराग शेट्टी यांच्या जोडीने उपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. आज झालेल्या सामन्यात त्यांनी डेन्मार्कच्या जोडीचा दोन-एक असा पराभव केला. महिला एकेरीत भारताच्या पी व्ही सिंधुला उप-उपान्त्यपूर्व फेरीत थायलंडच्या खेळाडुकडून २२-२०, १०-२१, १८-२१ असा पराभव पत्करावा लागला.

****

स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी अभ्यासाच्या वेळापत्रकाचं नियोजन, सातत्य, सराव आणि आत्मविश्वास आवश्यक असल्याचं प्रतिपादन हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केलं. हिंगोली इथं आयोजित मार्गदर्शन कार्यशाळेत ते बोलत

होते. जिल्ह्यातल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातल्या विद्यार्थ्यांना लाभ मिळावा यासाठी दर महिन्याच्या पहिल्या बुधवारी ही मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करणार असल्याचं जिल्हाधिकारी गुप्ता यांनी सांगितलं.

****

राज्यात येत्या तीन दिवसात पुन्हा वादळी वाऱ्यांसह, विजांच्या कडकडाटात पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. तसंच मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगरसह ३० पेक्षा अधिक जिल्ह्यांमध्ये 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला असून, शेतकऱ्यांनी सतर्क राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर शहरानजीकच्या खुलताबाद इथं १० दिवसांच्या विश्रांतीनंतर आज दुपारी पावसाच्या सरी कोसळल्या.

****